# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २५/०२/२०१६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक २५/०२/२०१६ रोजी सभा सुचना क्र. १९ दि. २०/०२/२०१६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. हरिश्चंद्र आंमगावकर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

<u>उपस्थित सदस्य</u>

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | मा. सभापती |
| २. | श्री. प्रशांत एन. केळूसकर | सदस्य |
| ३. | श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा | सदस्य |
| ४. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ५. | श्री. नरेश तुकाराम पाटील | सदस्य |
| ६. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| ७. | श्री. शरद केशव पाटील | सदस्य |
| ८. | श्री. दिनेश तेजराज जैन | सदस्य |
| ९. | श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| १०. | श्री. वेंचर गिल्बर्ट मेन्डोसा | सदस्य |
| ११. | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| १२. | श्रीम. बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| १३. | ॲड रवि व्यास | सदस्य |

<u>गैरहजर सदस्य –</u>

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सुहास माधवराव रकवी | सदस्य |
| २) | श्री. जयंतीलाल पाटील | सदस्य |
| ३) | श्रीम. डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |

मा. सभापती :-

सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

नगरसचिव :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दि. २५/०२/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १९, दि. २०/०२/२०१६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

प्रशांत केळुसकर :-

मा. सभापती साहेब आपले सन्मा. सदस्य मुन्ना सिंह यांना कालच्या महासभेत सभागृह नेता म्हणून घोषित केले. त्यांचे भारतीय जनता पार्टी तर्फे आणि स्टॅन्डिंग समिती सदस्यांतर्फे हार्दिक स्वागत करतो.

मा. सभापती :-

स्थायी समितीचे सदस्य श्री. मुन्ना सिंह ह्यांचे सभागृह नेतेपदी कालच्या महासभेत नियुक्ती झाली त्याचे स्थायी समितीच्या सर्व सदस्यातर्फे हार्दिक अभिनंदन करतो.

नगरसचिव :-

सभापती श्री. मुन्ना सिंह ह्यांना पुष्पगुच्छ देतात.

मोहन जाधव :-

सभागृह नेते श्री. मुन्ना सिंह ह्यांना बहुजन विकास आघाडी तर्फे शुभेच्छा देतो.

शर्मिला बगाजी :-

श्री. मुन्ना सिंह ह्यांची सभागृहनेतेपदी नियुक्ती झाल्या बद्दल कॉंग्रेस पक्षातर्फे अभिनंदन करतो.

नरेश पाटील :-

स्थायी समिती सदस्य श्री. मुन्ना सिंह ह्याची सभागृह नेतेपदी नियुक्ती झाल्याबद्दल राष्ट्रवादी कॉंग्रेसतर्फे त्यांचे अभिनंदन करतो.

मा. सभापती :-

आज मा. आयुक्तांचे लेटर आले होते की केंद्र शासनाचे अतिरिक्त सचिव नविन त्यांच्या अध्यक्षतेखाली दि. २५/०२/१६ रोजी २.३० मिनिटानी ते नवि दिल्ली येथे परिवहन बाबत आढावा बैठक आहे तर सदर बैठकीत उपस्थित राहणे आवश्यक होते. त्यामुळे आज मा. आयुक्त नसल्यामुळे आपण आजची बैठक उद्या दुपारी......

प्रशांत केळुसकर :-

बैठक उद्या घेण्यापेक्षा बजेटचा विषय असल्यामुळे आयुक्ताचा विषय आहे. सार्व. बांधकामचा एक विषय आहे तो गरजेचा नाही तो घेऊन टाका.

नगरसचिव :-

उद्या ३.०० वाजता सभा आहे. प्रकरण क्र. १६१, निविदांना मंजूरी देणेबाबत (सार्व. बांधकाम विभाग)

प्रशांत केळुसकर :-

प्रकरण क्र. १६१, निविदांना मंजूरी देणेबाबत (सार्व. बांधकाम विभाग) सदर प्रकरण फेटाळण्यात येत आहे. असा मी ठराव मांडतो.

दिनेश जैन :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर.

प्रकरण क्र. १६१ :-

निविदांना मंजूरी देणेबाबत (सार्व. बांधकाम विभाग)

ठराव क्र. १५६ :-

सदरचा विषय फेटाळण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर        अनुमोदक :- श्री. दिनेश जैन

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. सभापती :-

आजची सभा तहकुब करण्यात येत आहे.

(सभा तहकुबीची वेळ सकाळी ११.२० वाजता.)

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका